दुरितांचे तिमिर जावो ।

# जवाहर वार्तापत्र

संपादक : प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी

कार्यकारी संपादक : प्रा.डॉ. संजय कुलकर्णी
प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार

अंक : ३१ | वर्ष : २१ | पान : ०४ | खाजगी वितरणाकरिता | वार : शुक्रवार | दिनांक : २३ ऑगस्ट २०१९



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन चिरायु होवो !

छायाचित्रातुन....

एन.सी.सी.कॅम्प मध्ये जवाहर चे घवघवीत यश -



जवाहर महाविद्यालयात मुंन्शी प्रेमचंद जयंती साजरी



## जवाहर महाविद्यालयात वाजत-गाजत विद्यार्थ्यांचे स्वागत

जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम. या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवून द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी व प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी स्वागत केले व 'दर्शन' कार्यक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयात वर्षभर चालणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमासंबंधी सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाच्या प्रास्तविक प्रसंगी बोलताना डॉ. मीना जाधव म्हणाल्या की, 'दर्शन' कार्यक्रम हा वर्षभर होणाऱ्या कार्यक्रमाचा आरसा आहे. वर्षभर हसत खेळत ज्ञान संपादन करुन जीवनात यशस्वी व्हा.

शैक्षणिक अध्यापन समितीचे समन्वयक प्रा. डॉ. सोमशंकर राजमाने मत व्यक्त करताना म्हणाले की, 'शैक्षणिक घडामोडींवर मूल्यांकन' या समितीच्या माध्यमातून होणार आहे. वेळोवेळी होणाऱ्या महाविद्यालयीन परीक्षा, विज्ञान प्रदर्शन, परिसर अभ्यास भेटी इ. विषयी

पा.क.२ वर

## जवाहर महाविद्यालयात ई कन्टेन्ट कार्यशाळा

दि. ९ व १० ऑगस्ट २०१९ या दोन दिवशी महाविद्यालयातील IQUAC व वाणिज्य विभाग यांच्या अंतर्गत या कार्यशाळेचे



आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत नाविण्यपूर्ण शैक्षाणिक सुधारणा अंतर्गत मोबाईल पॉवर पाईंट , ध्वनी मुद्रण ,फोटोग्राफी, व्हिडीओ शुटिंग, निर्मित व्हिडीओ चे यु-ट्युब वरुन प्रसारण इत्यादींचे प्रशिक्षण या कार्यशाळेत देण्यात आले या प्रशिक्षणाकरीता नॉलेज ब्रीज चे संचालक श्री भूषण कुलकर्णी आणि श्री. एकनाथ कोरे , अहमदनगर यांनी दोन दिवस प्रशिक्षण दिले. शुक्रवार दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी 10 ते 11या वेळेत या कार्यशाळेचे उद्‌घाटन डॉ.मृणालिणी फडणवीस , कुलगुरू पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ , सोलापूर यांच्या हस्ते झाले . या प्रसंगी अध्यक्ष म्हणून डॉ. अशोक मोहेकर, माजी संचालक ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , औरंगाबाद उपकेंद्र उस्मानाबाद हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. एम.एम. बेटकर कुमार स्वामी महाविद्यालय , औसा तसेच सि.ना. आलुरे गुरुजी माजी आमदार व संस्थापक सचिव शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर. तसेच संचालक श्री गो.का. बिच्चे, महादेवप्पा आलुरे, रामचंद्र दादा आलुरे, तसेच मोहेकर मॅडम् उपस्थित होत्या.

या उद्‌घाटन प्रसंगी उद्‌घाटक म्हणून बोलताना डॉ. मृणालिणी फडणवीस यांनी ई-कंटेंन्ट चा संशोधनासाठी वापर



करावा तसेच संशोधन समाजउपयोगी स्वत:चे विचार व्यक्त करणारे असावे. इतरांच्या संशोधनाचा मजकूर घेऊ नये. आधुनिक काळातील शिक्षणासाठी ई -कंटेंन्ट चा वापर अत्यावश्यक असून प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी तो आत्मसात करणे गरजेचे आहे असे त्या म्हणाल्या.अध्यक्षीय भाषणात डॉ. अशोक मोहेकर यांनी संशोधनासाठी तसेच शिक्षणासाठी ही ई- कंटेंन्टा चा वापर करावा असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर षष्ट्यब्दी वर्षानिमित्त ही कार्यशाळा आयोजित केली असून उस्मानाबाद ,बीड, लातूर, या तीन जिल्ह्यात ही नाविण्यपूर्ण कार्यशाळा घेणारे हे आपले पहिले महाविद्यालय आहे. या कार्यशाळेत २०५ सभासदांनी नोंदणी केली असून त्यापैकी प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १५ शिक्षक सहभागी झाले होते तर १९० प्राध्यापक राज्याबाहेरील व राज्यांतर्गत उपस्थित होते. त्यामुळे ही कार्यशाळा उस्फूर्तपणे यशस्वी झाली.

दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी भूषण कुलकर्णी यांनी या कार्यशाळेत पावर-पॉईंट च्या स्लाईड, आकृत्यांची निर्मिती

पा.क.३ वर

## जागतिक योग दिन साजरा

अणदूर : जागतिक योग दिना निमित्त जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय व जवाहर महाविद्यालयात शुक्रवारी दि. २१) योगसाधना करुन 'योगदिन' साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. गो.का. बिच्चे यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव, माजी आमदार सि.ना. आलुरे गुरुजींनी उपस्थित राहून



आंतरराष्ट्रीय योगदिनानिमीत्त मार्गदर्शन करतांना संस्थेचे सचिव माजी आमदार आवरणीय सि.ना.आलुरे गुरुजी व विद्यार्थी,ग्रामस्थ

मार्गदर्शन केले.त्याप्रसंगी जवाहर विद्यालय, जवाहर उच्च माध्यमिक विद्यालय,जवाहर मविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. योगप्रकारंचे प्रात्याक्षिक प्रा.डॉ.एम.बी. बिराजदार प्रा. सुर्यकांत आगलावे व जयहिंद पवार यांनी केले.

या वेळी मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी उपस्थित होते, प्रवीण गुरव यानी सूत्रसंचालन केले.

## जवाहर महाविद्यालयात फॅशन डिझाईनिंगवर कार्यशाळा संपन्न

जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर व कै. शांताकाकी आलुरे महिला सक्षमीकरण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने फॅशन डिझाईनिंगवर कार्यशाळा घेण्यात आले. या कार्यशाळेचे उद्‌घाटन लिबर्टी फॅशन इन्स्टिट्युट, पुणे चे संचालक मा. श्री. दिलीप कारमपुरी यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी सौ. आराधना कारमपुरी सौ. पुनम मिरगे उपस्थित राहून महिलाना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे समन्वयक प्रा.डॉ.





प्रात्याक्षिकाच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी व गावातील मीना जाधव यांनी प्रास्ताविक केले.....

पा.क्र. ०३ वर

